**2.1.2 Reservation Policy**

# Index Page


| Sr. No. | Document | Page No. |
|---|---|---|
| 1 | Seats earmarked for reservation | 2 |
| 2 | Maharashtra Govt. G.R. on Minority College Admission Rules. | 3-6 |
| 3 | University Letter for General Reservation Policy. | 7 |
| 4 | Govt. of Maharashtra Resolution for 50% reservation policy. | 8-10 |
| 5 | 30% Reservation policy for women | 11-12 |
| 6 | 3% Reservation policy for Divyangjan | 13 |
| 7 | 10% reservation for EWS | 14-19 |

**Reservation distribution chart (A.Y. 2020-21)**

**UG Programme**

| Programme | Intake | Minority (51%) | Distribution for remaining seats | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | SC 13% | ST 7% | VJ-NT | | | | OBC 19% | EWS 10% | General 40% |
| | | | | | A 3.0% | B 2.5% | C 3.5% | D 2.0% | | | |
| B.Sc. | 60 | 31 | 4 | 2 | 1 | 1 | 1 | 0 | 5 | 3 | 12 |
| B.A. | 120 | 61 | 8 | 4 | 2 | 1 | 2 | 1 | 11 | 6 | 24 |
| B.Com. | 120 | 61 | 8 | 4 | 2 | 1 | 2 | 1 | 11 | 6 | 24 |

30% parallel reservation for female in each category.
3% parallel reservation for divyangjan

**PG Programme**

| Programme | Intake | Other University (10%) | Distribution for remaining 27 seats | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | SC 13% | ST 7% | VJ-NT | | | | OBC 19% | EWS 10% | General 40% |
| | | | | | A 3.0% | B 2.5% | C 3.5% | D 2.0% | | | |
| M.Sc. | 30 | 3 (General-1) (SC-1) (OBC-1) | 3 | 2 | 1 | 1 | 1 | 0 | 5 | 3 | 11 |

# Maharashtra Govt. G.R. on Minority College Admission Rules.

महाराष्ट्र राज्यातील धार्मिक / भाषिक अल्पसंख्याकांकडून चालविण्यात येणाऱ्या शैक्षणिक संस्थांनी विद्यार्थ्यांना प्रवेश देताना अवलंबण्याच्या कार्यपध्दती, अटी व शर्ती यामध्ये सुधारणा करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

अल्पसंख्याक विभाग

शासन परिपत्रक क्रमांकः **अशैसं- २०१२/प्र.क्र.२१/कार्या-५**

**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक**

**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**

दिनांक : १८ जून, २०१४

**वाचा:- शासन निर्णय क्रमांकः अल्पसंख्यांक विकास विभाग क्रमांकः अशैसं- २०१२/प्र.क्र.२१/कार्या-५ दिनांक २७.०५.२०१३**

**प्रस्तावना :-**

राज्यातील अल्पसंख्यांकडून चालविण्यात येणाऱ्या शैक्षणिक संस्थाना धार्मिक /भाषिक अल्पसंख्याक संस्था म्हणून दर्जा प्रदान करण्याबाबतची कार्यपध्दती, अटी व शर्ती संदर्भाधिन शासन निर्णयान्वये विहित करण्यात आल्या आहेत. राज्यातील अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थाना प्रदान केलेल्या संबंधित धार्मिक/भाषिक समुहातील विद्यार्थी उपलब्ध होत नसल्याने वारंवार उच्च, तांत्रिक अथवा व्यवसायिक अभ्यासक्रम चालवणाऱ्या शैक्षणिक संस्थाकडून संदर्भाधिन शासन निर्णयातील कार्यपध्दती, अटी व शर्ती या मध्ये सुधारणा करण्याबाबतची मागणी करण्यात येत होती. याबाबत सर्वंकष विचार करुन उपरोक्त संदर्भाधिन शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन परिपत्रक :-**

प्रवेश भरतीसंबंधी उपरोक्त संदर्भीय शासन निर्णय दि. २७.०५.२०१३ च्या भाग "अ" परिच्छेद क्र. १०(iv) येथील (अ) (ब) व (क) मध्ये सुधारणा करण्यात येत असुन हे सुधारीत परिच्छेद खालील प्रमाणे आहेत.

१० (iv) - अल्पसंख्यांक संस्थांमार्फत चालविण्यात येणा-या उच्च, तांत्रिक अथवा व्यवसायिक शैक्षणिक संस्थांत अल्पसंख्याकांना प्रवेश देणेबाबत :- पदवी / पदविका व पुढील अभ्यासक्रमांसाठी खालील प्रमाणे प्रवेश प्रक्रिया राबविण्यात यावी.

I) अनुदानित अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था :-अ) सर्व अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांनी सामाईक प्रवेश चाचणीद्वारे किंवा गुणवत्तेद्वारे पारदर्शक पध्दतीने प्रवेश करावेत.

(ब) अनुदानित धार्मिक/भाषिक अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांनी त्यांच्या प्रवेश क्षमतेच्या कमीत कमी ५० % जागावर त्यांना प्राप्त झालेल्या अल्पसंख्याक दर्जाच्या समुहातील विद्यार्थ्यांना प्रवेशांमध्ये अग्रक्रम (Priority) देण्यात यावा. जर, संबंधित धार्मिक /भाषिक अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थेस उपरोक्त प्रमाणे त्यांच्या अल्पसंख्याक दर्जा प्राप्त समुहातील धार्मिक/भाषिक ५०% विद्यार्थी उपलब्ध झाले नाहीत, तर पुढील प्रमाणे कार्यवाही करावी.

(i) अनुदानित धार्मिक अल्पसंख्याक संस्था:- अनुदानित धार्मिक अल्पसंख्याक संस्थानी राज्य शासनाने घोषित केलेल्या अन्य धार्मिक अल्पसंख्याक समुहातील विद्यर्थ्याना प्रवेश द्यावेत व अन्य धार्मिक अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थ्यी देखील उपलब्ध न झाल्यास अल्पसंख्याक कोटयातील जागांवर भाषिक अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत व त्यानंतर सर्वंकष प्रयत्न केल्यानंतर सुध्दा काही जागा रिक्त राहिल्यास रिक्त जागी बिगर अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शासनाची पूर्वपरवानगी घेऊन प्रवेश देण्यात यावेत.

(ii) अनुदानित भाषिक अल्पसंख्याक संस्था :- अनुदानित भाषिक अल्पसंख्याक संस्थानी राज्य शासनाने घोषित केलेल्या अन्य भाषिक अल्पसंख्याक समुहातील विद्यर्थ्याना प्रवेश द्यावेत व अन्य भाषिक अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थीदेखील उपलब्ध न झाल्यास उर्वरित रिक्त अल्पसंख्याक कोटयातील जागांवर धार्मिक अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत व त्यानंतर सर्वंकष प्रयत्न केल्यानंतर सुध्दा काही जागा रिक्त राहिल्यास रिक्त जागी बिगर अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शासनाची पूर्वपरवानगी घेऊन प्रवेश देण्यात यावेत.

(iii) तसेच उर्वरित ५०% जागा खुल्या प्रवर्गातील बिगर अल्पसंख्यांक विद्यार्थ्यामधून भरतांना राज्य शासनाच्या संबंधित शैक्षणिक विभागांनी समाजातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जाती, विमुक्त जाती विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग इ.दुर्बल घटकांसाठी आरक्षित केलेल्या जागाप्रमाणे प्रवेश देणे बंधनकारक आहे.

II विना अनुदानित अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था :- सर्व विना अनुदानित अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांनी सामाईक प्रवेश चाचणीद्वारे किंवा गुणवत्तेद्वारे पारदर्शक पध्दतीने प्रवेश करावेत.

क) विनाअनुदानित धार्मिक/भाषिक अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांनी त्यांच्या प्रवेश क्षमतेच्या कमीत कमी ५१% प्रवेश त्यांना प्राप्त असलेल्या दर्जाच्या समुहाच्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत. जर,

संबंधित धार्मिक /भाषिक अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थेस उपरोक्त प्रमाणे ५१% त्यांच्या अल्पसंख्याक दर्जा प्राप्त समुहातील धार्मिक/भाषिक विद्यार्थी उपलब्ध झाले नाही तर, पुढील प्रमाणे कार्यवाही करावी.

(i) विनाअनुदानित धार्मिक अल्पसंख्याक संस्था:- विनाअनुदानित धार्मिक अल्पसंख्याक संस्थानी राज्य शासनाने घोषित केलेल्या धार्मिक अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत व अन्य धार्मिक अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थी देखील उपलब्ध न झाल्यास अल्पसंख्याक कोटयातील जागांवर भाषिक अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत व त्यानंतर सर्वंकष प्रयत्न केल्यानंतर सुध्दा काही जागा रिक्त राहिल्यास रिक्त जागी बिगर अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शासनाची पूर्वपरवानगी घेऊन प्रवेश देण्यात यावेत.

ii) विनाअनुदानित भाषिक अल्पसंख्याक संस्था:- विनाअनुदानित भाषिक अल्पसंख्याक संस्थानी राज्य शासनाने घोषित केलेल्या अन्य भाषिक अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत व अन्य भाषिक अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थी देखील उपलब्ध न झाल्यास उर्वरित रिक्त अल्पसंख्याक कोटयातील जागांवर धार्मिक अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत व त्यानंतर सर्वंकष प्रयत्न केल्यानंतर सुध्दा काही जागा रिक्त राहिल्यास रिक्त जागी बिगर अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शासनाची पूर्वपरवानगी घेऊन प्रवेश देण्यात यावेत.

iii) तसेच उर्वरित ४९% जागा खुल्या प्रवर्गातील बिगर अल्पसंख्यांक विद्यार्थ्यामधून भरतांना संबंधित शैक्षणिक संस्थांनी खुल्या प्रवर्गातील तसेच त्यांच्या स्वेच्छेने समाजातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जाती, विमुक्त जाती, विशेष प्रवर्ग इत्यादींना सामाजिक न्याय व समतोल साधण्याकरिता प्रवेश द्यावेत.

वरील प्रमाणे कार्यवाही करताना अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांना भाग "अ" च्या परिच्छेद १०(iv) (ड) मध्ये नमुद केल्याप्रमाणे वृत्तपत्रात जाहिराती प्रसिध्द करण्यात याव्यात व जाहिरातीमध्ये अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थेस प्राप्त धार्मिक/भाषिक अल्पसंख्याक दर्जा प्रमाणे तसेच राज्य शासनाने घोषित केलेले राज्यातील अन्य धार्मिक/भाषिक अल्पसंख्याक व बिगर अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकडून, यथास्थिती, अर्ज मागविण्यात यावेत. उपरोक्त जाहिरातीमध्ये संस्थेस प्राप्त अल्पसंख्याक दर्जाचे विद्यार्थी उपलब्ध झाले नाहीत तर, त्यानंतर अन्य अल्पसंख्याक धार्मिक/भाषिक समुहातील विद्यार्थ्यींना गुणवत्तेच्या आधारे प्रवेश देण्यात येतील, असे नमुद करण्यात यावे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१४०६१८१४५१२४२६१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ainul Chand Attar

Digitally signed by Ainul Chand Attar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=MDD, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Ainul Chand Attar
Date: 2014.06.18 14:53:32 +05'30'

**श्रीमती अैनुल अत्तार**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३. मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव,
४. मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
६. प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
७. प्रबंधक, अपिलीय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
८. प्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई, नागपूर, खंडपीठ नागपूर
९. प्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद
१०.प्रबंधक, लोक आयुक्त कार्यालय, मुंबई
११.धर्मादाय आयुक्त, उच्च न्यायालय, मुंबई
१२.महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
१३.सर्व विभागीय आयुक्त
१४.सर्व जिल्हाधिकारी
१५.संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई
१६.संचालक, वैद्यकीय शिक्षण, मुंबई
१७.संचालक, समाजकल्याण संचालनालय, पुणे
१८. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
१९. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
२०. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय (प्रसिध्दीसाठी)
२१. निवडनस्ती

# University Letter for General Reservation Policy.

सोलापूर विद्यापीठ
विशेष कक्ष विभाग
सोलापूर-पुणे महामार्ग केगांव
सोलापूर - ४१३ २५५ (महाराष्ट्र)
ईपीएबीक्स-०२१७ -२७४४७६०/६१/६३/६६/७१/७२/७३/७४/७८/७९
फॅक्स नं. ०२१७-२७४४७७७
संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in
ई-मेल - bcud@sus.ac.in, bcudspecial@sus.ac.in

सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accreditied-2015 'B' Grade (CGPA 2.62)

SOLAPUR UNIVERSITY
Special cell Section
Solapur-Pune National Highway, Kegaon,
Solapur-413 255 (Maharashtra)
EPABX :0217-2744760/61/63/66/71/72/73/74/78/79
Fax No. 0217-2744777
Website: http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in
Email : bcudsu@sus.ac.in
bcudspecialcell@sus.ac.in

जावक क्र. सोविसो/विशेष कक्ष/२०१८-१९/ 5937

दि. 12 JUL 2018

प्रति,
मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
सोलापूर विद्यापीठ,
सोलापूर,

**विषय :-** विविध विद्याशाखा/विभागांतर्गत विविध विषयातील अभ्यासक्रमाच्या प्रवेशाबाबत...
**संदर्भ :-** १) महाराष्ट्र राज्य विशेष मागासप्रवर्ग महासंघ, सोलापूर यांचे पत्र दि. ०२/०७/२०१८.
२) विद्यापीठ परिपत्रक क्र. सोविसो/म.वि.वि.मं./विशेष कक्ष/२०१५-१६/३८१५ दि. २२/०७/२०१५.
३) विद्यापीठ परिपत्रक क्र. सोविसो/म.वि.वि.मं./विशेष कक्ष/२०१६-१७/९४९५ दि. ०७/१०/२०१६.

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन, विविध विद्याशाखा/विभागांतर्गत विविध विषयातील अभ्यासक्रमाच्या प्रवेशाबाबत शासनाने वेळोवेळी दिलेल्या सुचनेनुसार आरक्षणाबाबत काटेकोर अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. तथापी काही महाविद्यालय/संकुलांकडून याप्रमाणे कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनास आले आहे.

शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनेनुसार विद्यार्थी प्रवेशासाठी राखीव जागांचे विहित करण्यात आलेले प्रमाण पुढीलप्रमाणे -

| अ.क्र. | प्रवर्ग | | आरक्षणानुसार टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | अनुसूचित जाती | S.C. | १३% |
| २. | अनुसूचित जमाती | S.T. | ७% |
| ३. | विमुक्त जाती (अ) | VJ-A | ३% |
| ४. | भटक्या जमाती (ब) | NT-B | २.५% |
| ५. | भटक्या जमाती (क) | NT-C | ३.५% |
| ६. | भटक्या जमाती (ड) | NT-D | २% |
| ७. | इतर मागास वर्ग | OBC | १९% |
| ८. | सर्वसाधारण (खुला) | OPEN | ५०% |

तरी उपरोक्तप्रमाणे विद्यार्थी प्रवेशाबाबतचे प्रमाण विचारात घेऊन, शासन निर्णय क्र. टीईएम ३३९७/१२९२३/(९०८६)/तांशि-१, दि. ११ जुलै, १९९७ नुसार विद्यार्थी प्रवेशाबाबत कार्यपध्दती राबवावी.

कळावे,

आपला विश्वासू,

[प्रा. डॉ. व्ही. बी. पाटील]
विशेष कार्यासन अधिकारी
शैक्षणिक, संशोधन आणि विकास

प्रत :-
१) मा. संचालक, सर्व संलग्नित संकुले, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.
२) प्रवेश विभागास, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

**प्रत माहितीस्तव :-** श्री. अशोक इंदापुरे, निमंत्रक, महाराष्ट्र राज्य विशेष मागास प्रवर्ग महासंघ, रविवार पेठ, सोलापूर.

संवैधानिक आरक्षण ५० टक्क्यापेक्षा जास्त
होऊ न देण्याबाबत

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग.
शासन निर्णय क्र. टीईएम ३३९७/१२९२६/(९०८६)/तांशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२.
दिनांक : ११ जुलै, १९९७.

संदर्भ:- १) शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र.युएसजी १४९३/२४२८/विशि-४. दि.२३ जून,१९९४ व समक्रमांकित शुध्दिपत्रक दि. जुलै,१९९४.
२) शासन निर्णय समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग क्र.सीबीसी १४९४/प्र.क्र.२३६/ मावक-५, दि.१३ जून,१९९५ व समक्रमांकित शुध्दिपत्रक दि.१५ जून,१९९५.
३) शासन निर्णय क्र.सामान्य प्रशासन विभाग क्र.बीबीसी १०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दि.१५ जून, १९९५ व शुध्दिपत्रक दि.२१ मार्च,१९९६.
४) शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र.युएसजी १४९३/२४२८/विशि-४, दि.२२ जून, १९९५.
५) अतिरिक्त सरकारी वकील, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्र.एडीजीएल/रिटपी/ एसएसजी. दि.१०.७.१९९७

प्रस्तावना:-

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी १०९३/१६७/सीआर-१४१/४१/९३/१६-ब, दि. २३ मार्च, १९९४ अन्वये विविध मागास प्रवर्गासाठी एकूण ५० टक्के आरक्षण विहित करण्यात आले होते. नंतर सामाजिकदृष्टया व शैक्षणिकदृष्टया मागासलेल्या काही जातींच्या विकासासाठी काही सवलती व उपाययोजना करणे आवश्यक असल्यामुळे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी १०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दि.८ डिसेंबर, १९९४ चे परिशिष्ट अ मध्ये नमूद केलेल्या जातींसाठी एक स्वतंत्र 'विशेष मागास प्रवर्ग' असे संबोधण्यात येऊन त्यांच्यासाठी २ (दोन) टक्के आरक्षण ठेवण्यात आले होते. तसेच या प्रवर्गासाठी क्रिमिलीयरचे तत्व लागू नाही हेही स्पष्ट करण्यात आले होते.

दि. ८ डिसेंबर, १९९४ च्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन आदेशास अनुसरून उच्च व तंत्रशिक्षण विभागाने 'विशेष मागास प्रवर्गासाठी' २ टक्के आरक्षण ठेवून शासन निर्णय क्र.युएसजी १४९३/ (२४२८)/विशि-४, दि.२२ जून. १९९५ अन्वये विविध आरक्षणाबाबत आदेश निर्गमित केले आहेत. सदर निर्णयाद्वारे विशेष मागास प्रवर्गासाठी २ टक्के आरक्षणाची तरतूद करण्यात आली असून एकूण आरक्षण ५२ टक्के विहित केले आहे.

'भारतीय संविधान अनुच्छेद १४ तसेच १६ अन्वये सर्व प्रवर्गातील घटकांना समानता व समान संधी मिळावी' म्हणून मा. सर्वोच्च न्यायालयाने १९९३ साली मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षण ५० टक्क्यापेक्षा जास्त असू नये असा निवाडा दिला आहे.

रिट याचिका क्र. २९८९/१९९७, श्री. पांडुरंग एस. पखाले विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर, या प्रकरणी सुनावणी सुरु असताना मा. उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाने अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या १९९७-९८ या शैक्षणिक वर्षाच्या प्रवेश नियमावलीत संवैधानिक आरक्षणासाठी केलेली ५२ टक्के जागांची तरतुद मा. सर्वोच्च न्यायालयाने इंद्रा सॉहनी विरुध्द केंद्र या प्रकरणी १९९३ साली दिलेल्या निवाड्यानुसार नसल्यामुळे कायदेशीर नसल्याचे शासनाचे निदर्शनास आणून दिले आहे. (संदर्भः १९९३-मा. सर्वोच्च न्यायालय ए.आर.-पृ.क्र.४७७, शीर्ष टिप्पणी (डब्ल्यू) प्रवेश नियमावलीतील राज्य शासनाने संवैधानिक आरक्षणासाठी केलेली ५२ टक्के जागांची तरतूद हा मा. सर्वोच्च न्यायालयाचा अवमान ठरु शकतो असेही मा. उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. यावर संवैधानिक आरक्षणाचे प्रमाण ५२ टक्क्यावरुन ५० टक्के करण्याबाबतचे आदेश तात्काळ निर्गमित करण्यात येतील असे शासनातर्फे प्रतिपादन केल्यानंतर मा. उच्च न्यायालयाने समाधान व्यक्त केले असून उपरोक्त संदर्भात शासन आता खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## शासन निर्णयः-

शासन आता या शासन निर्णयाद्वारे असे आदेश देत आहे की, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अधिपत्याखाली येत असलेल्या सर्व शैक्षणिक संस्थांतील अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी या विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्र. युएसजी १४९३/(२४२८)/विशि-४, दि.२२ जुन, १९९५ अन्वये विशेष मागास प्रवर्गाकरिता राखुन ठेवण्यात आलेल्या २ टक्के जागांचे आरक्षणाबाबत पुढील आदेशापर्यंत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे. हे आदेश १९९७-९८ या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यात येत असून तात्काळ अंमलात येतील व उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत शैक्षणिक संस्थांतील सर्व विद्या शाखांतील अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी लागू राहतील.

१. विशेष मागास प्रवर्गात ज्या जाती आहेत त्यापैकी काही जाती इतर मागासवर्गीयांमध्ये समाविष्ट होत्या. त्यामुळे पुर्व्वातील विशेष मागास प्रवर्गाचे प्रमाणपत्र धारक उमेदवारांची जात ज्या मागास प्रवर्गामध्ये समाविष्ट होती, त्या मागास प्रवर्गाच्या आरक्षणासाठी पात्र समजण्यात यावी.

२. भारतीय संविधानानुसार मंडल आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र.टीइएम १०९४/(६३०३)/तांशि-१, दि.३ जून, १९९४ मधील परिच्छेद क्र.४ मध्ये विहित केल्याप्रमाणे एकूण ५० टक्के जागा आरक्षित करण्यात याव्यात. सदर आरक्षण प्रत्येक संस्थेमध्ये अभ्यासक्रम निहाय राहील. मुक्त (मेरीट सीटस्) तसेच मूल्यभारित (पेमेंट सीटस्) जागांकरिता त्यांच्या त्यांच्या प्रमाणात असावे.

३. गुणवत्ता यादीनुसार प्रवेश प्रक्रिया केल्यानंतर जर कोणत्याही मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागांपैकी काही जागा रिक्त राहिल्या तर त्या जागांवर एकुण प्रवेश क्षमतेच्या जास्तीत जास्त २ टक्के पर्यंत प्रवेशासाठी विशेष मागास प्रवर्गीय उमेदवारांना प्रवेशासाठी प्राधान्य देण्यात यावे.

४. रिक्त जागांवर विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना कमाल २ टक्के जागांवर प्रवेश दिल्यानंतर जर जागा रिक्त राहिल्या तर त्या जागा इतर सर्व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांची गुणवत्तेनुसार सरमिसळ करुन भरण्यात याव्यात.

२. शासन यापुढे असेही आदेश देत आहे की, १९९७-९८ या शैक्षणिक वर्षासाठी ज्या अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरु झाली असेल व दि.९.७.१९९७ रोजी किंवा तत्पूर्वी या विभागाच्या दि.२२ जून, १९९५ च्या शासन निर्णयानुसार प्रवेश देण्यात आले असतील तर त्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात यावी:-

१. विशेष मागासवर्ग प्रवर्गांतर्गत करण्यात आलेल्या प्रवेशास बाधा न आणता पुढील प्रवेश प्रक्रियेत काही कारणास्तव होणाऱ्या रिक्त जागांवर ५० टक्के आरक्षित जागा जुळवून घ्याव्यात.

२. संवैधानिक आरक्षण कुठल्याही परिस्थितीत ५० टक्क्यापेक्षा जास्त होणार नाही याची दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( ओं. शि. विहाडे )
शासनाचे सहसचिव.

# Govt. of Maharashtra Resolution for 50% reservation policy.

200408111303040 0 9-2402

**महाराष्ट्र राज्यातील सर्व पारंपारिक विद्यापीठे व त्यांना संलग्नित असलेल्या महाविद्यालयांतील पदवी अभ्यासक्रमांकरिता महिलांसाठी ३० टक्के आरक्षण ठेवण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

**शासन निर्णय क्र. जीईसी-१०००/(१२३/२०००)/तांशि-१**

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२

दिनांक: १७ एप्रिल, २०००

**प्रस्तावना:-**

भारताच्या संविधानात, स्त्री-पुरूष भेद न ठेवता समानतेचे तत्व हा नागरीकांचा मूलभूत हक्क मानण्यात आला आहे. तसेच महिलांच्या बाबतीतही घटनेत सकारात्मक धोरण स्विकारण्यात आले आहे. महिलांना पुरूषांच्या बरोबरीने संधी देणे अपेक्षित असले तरी विविध शिक्षण अभ्यासक्रमाकरिता स्त्रियांना समान संधी प्रत्यक्षात मिळत नाही. स्त्रियांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी त्यादृष्टीने खरा प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यानुसार महिलांचे बलशालीकरण आणि समाजाच्या सर्व क्षेत्रामध्ये महिलांचा सक्रिय सहभाग करून सर्वांगीण मानवी विकासाच्या विविध क्षेत्रामध्ये सकारात्मक परिणाम घडवून आणण्यासाठी महिलांच्या शिक्षणाकडे जाणिवपूर्वक लक्ष देणे आवश्यक आहे. ही बाब विचारात घेऊन शासन निर्णय दि.२२.६.१९९४ अन्वये शासनाने महिलांना शासकीय नोकरीमध्ये ३०टक्के जागा आरक्षित ठेवल्या आहेत. यामागील खरा हेतू साध्य होण्याकरिता आता महिलांना पदवी अभ्यासक्रमाकरिता ३०टक्के आरक्षण ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्यात पदवी स्तरावरील सर्व अभ्यासक्रमांकरिता महिलांसाठी ३०टक्के आरक्षण ठेवण्याबाबत शासनाचा विचार होता.

**शासन निर्णय:-**

वरील सर्व वस्तुस्थिती विचारात घेऊन शासन आता असे आदेश देत आहे की, महाराष्ट्र राज्यातील सर्व पारंपारिक विद्यापीठे व त्यांना संलग्नित असलेल्या सर्व शासकीय, अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयांतील पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता महिलांसाठी ३०टक्के आरक्षण ठेवण्यात येत आहे.

सदरचे आरक्षण बिनराखीव व राखीव या दोन्ही प्रवर्गासाठी लागू राहील. जर बिनराखीव जागा १०० असतील तर त्यापैकी ३० जागा महिलांकरिता आरक्षित राहतील.

तसेच सदरचे आरक्षण हे सध्या विविध सामाजिक प्रवर्गाकरिता विहित केलेल्या संविधानात्मक राखीव जागा अंतर्गत समांतर आरक्षण (Horizontal) राहील. उदाहरणार्थ जसे की, सध्या संविधानातील तरतुदीनुसार शासनाने अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता १३ टक्के जागा आरक्षित आहेत. त्यापैकी त्यातील ३०टक्के आरक्षण हे अनुसूचित जाती या प्रवर्गातील महिला उमेदवारांकरिताच ठेवण्यात येईल व जर या प्रवर्गातील किमान पात्रता असलेल्या महिला उमेदवार प्राप्त न झाल्यास त्या जागा अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील पुरूष संवर्गातून भरण्यात येतील. म्हणजेच जर प्रवेशाकरिता एखाद्या विद्याशाखेसाठी प्रथम वर्षासाठी १०० जागा असतील तर त्यापैकी १३ जागा अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील उमेदवारांकरिता सध्या असलेले आरक्षण विचारात घेऊन त्यापैकी ३०टक्के म्हणजेच ४ जागा हया अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील महिला उमेदवारांकरिता आरक्षित राहतील.

एच-239(1000-4-00) (कृ.मा.प.

वर उल्लेखिलेल्या पध्दतीनेच इतर सर्व प्रवर्गाकरिताही सध्या असलेल्या आरक्षणांतर्गत महिलांना ३०टक्के समांतरपणे आरक्षण ठेवण्यात येईल. तसेच ज्या पदवी अभ्यासक्रमांकरिता मूल्यभारीत व मुक्त जागांवर देण्यात येतात ह्या प्रवेशा अंतर्गत देखील ३०टक्के आरक्षण महिलांकरिता देण्यात येईल.

सध्या सर्व तंत्र निकेतनांमध्ये पदविका अभ्यासक्रमासाठी महिलांकरिता शासन निर्णय क्र.डब्ल्युबीपी-१०९५/(२७१९)/व्यशि-५, दि.१७.१.१९९६ अन्वये ठेवलेल्या २५ टक्के आरक्षणात वाढ करून आता ते ३०टक्के इतके करण्यात येत आहे..

सदरच्या आरक्षित जागांवर जर महिला उमेदवार उपलब्ध झाल्या नाहीत तर या रिक्त जागा त्याच शैक्षणिक वर्षात पुरूष संवर्गातून भरण्यात येतील व या रिक्त जागांचा त्या पुढील शैक्षणिक वर्षात अनुशेष धरला जाणार नाही.

वैद्यकीय शिक्षण विभाग आणि कृषि व पदुम विभागांतर्गत येणाऱ्या सर्व पदवी अभ्यासक्रमांकरिता आदेश संबंधित विभागाकडून स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

सदरचे आरक्षणविषयक आदेश शैक्षणिक वर्ष सन २०००-२००१ पासून अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(प्र. ह. क्षीरसागर)
शासनाचे सहसचिव

प्रति,
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, उद्योगधंदे-संस्था-समन्वय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कला संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व विद्यापीठांचे कुलगुरू व कुलसचिव
सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण / उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये.
प्राचार्य, सर्व अभियांत्रिकी/तंत्रशास्त्र महाविद्यालये, तंत्र निकेतने व संस्था (तंत्र शिक्षण संचालकामार्फत)
प्राचार्य, सर्व वरिष्ठ महाविद्यालये (उच्च शिक्षण संचालकांमार्फत)
मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव
मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक.
मा. सचिव, कृषि यांचे स्वीय सहाय्यक,
मा. सचिव, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय यांचे स्वीय सहाय्यक,
मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग यांचे स्वीय सहाय्यक,
मा. सचिव, शालेय शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक,
मा. प्रधान सचिव, वित्त यांचे स्वीय सहाय्यक,
मा. सचिव (सर्वसाधारण उपविभाग), सामान्य प्रशासन विभाग यांचे स्वीय सहाय्यक,
सर्व मंत्रालयीन विभाग.
सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखाली येणारी सर्व विभागीय कार्यालये (संबंधित विभागामार्फत)
सर्व कार्यासने, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती, तांशि-१.

# 3% Reservation policy for Divyangjan

महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१

Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in
फोन नं. ०२० / २६१२२१९९, २६०५९५१२, २६१३०६२७, २६१२४६३९. फॅक्स नं.- ०२०/२६१२११५३

क्र.उशिसं/२०१६/ अपंग /मवि-१ / ४९११ दिनांक ०२/०४/२०१६
स्मरणपत्र तात्काळ / कालमर्यादित 7 APR 2016

प्रति,
१) विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण, सर्व विभाग.
२) कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे,
महाराष्ट्र राज्य.

विषय :- अपंग विद्यार्थ्यांना सर्व महाविद्यालये, शाळा, वसतिगृह यामधील प्रवेशामध्ये ३ % आरक्षणाबाबत निर्देश देण्याची कार्यवाही करणेबाबत.

संदर्भ :- १) शासन पत्र क्र. संकीर्ण-२०१६/ प्र.क्र. ९२/ मशि-१ , दि.१७.०३.२०१६
२) संकीर्ण -२०१५/प्र.क्र.११८-१५/ आस्था-२, दि.२९.०७.२०१५
३) संचालनालयाचे पत्र क्र. क्र.उशिसं/ २०१५ /अपंग /मवि-१/८७७१, दि.५.०९.२०१५

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भ क्र.२ च्या शासन पत्रात दिलेल्या सुचनांनुसार संदर्भ क्र.३ च्या संचालनालयाच्या पत्रान्वये आपणास अपंग विद्यार्थ्यांना सर्व महाविद्यालये, शाळा, वसतिगृह यामधील प्रवेशामध्ये ३ % आरक्षणाबाबत कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आलेले होते. सदर विषयाबाबत काटेकोर अंमलबजावणी व्हावी व सहानुभूतीचा दृष्टीकोन ठेवून अपंग विद्यार्थ्यांचे शारिरिक श्रम कमी व्हावेत याकरिता शाळा महाविद्यालयांबरोबरच वसतिगृहांमध्येही अपंग विद्यार्थ्यांना प्राधान्याने प्रवेश देण्यात यावा याबाबत सूचना देण्यात आलेल्या होत्या.

तथापि आपण केलेल्या कार्यवाहीचे अहवाल संचालनालयास अप्राप्त असल्याने शासनास माहिती सादर करता येत नाही. सदर विषयाबाबत आपल्या अधिनस्त सर्व विद्यापीठे, संस्था, महाविद्यालये यांना उचित कार्यवाहीच्या सूचना त्वरीत देण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाहीचा एकत्रित अहवाल संचालनालयास तात्काळ सादर करावा.

(डॉ.व्ही. आर. मोरे)
सहसंचालक
उच्च शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य , पुणे- १

सोबत-
संदर्भ क्र. १ व २ ची प्रत

**सोलापूर विद्यापीठ, सोलापूर**
सोलापूर पुणे महामार्ग, केगांव,
**सोलापूर** - ४१३ २५५ (महाराष्ट्र राज्य)
website: http://su.digitaluniversity.ac
Fax : 91-0217-2744777

**SOLAPUR UNIVERSITY, SOLAPUR**
Solapur Pune National Highway, Kegaon,
**Solapur** - 413 255 (Maharashtra)
EPABX: 0217-2744763, 66,67 Ext-122
Email : bcud@sus.ac.in

**जा.क्र. सोविसो/मविविमं/संलग्नता/** 5372 **दिनांक:** 9 JUN 2016

**प्रति,**
**मा.प्राचार्य /संचालक / सचिव,**
**सर्व संलग्नित महाविद्यालये,**

**विषय- अपंग विद्यार्थ्यांना सर्व महाविद्यालये, शाळा, वसतिगृह यामधील प्रवेशामध्ये ३ % आरक्षणाबाबत निर्देश देण्याची कार्यवाही करणेबाबत.**

**संदर्भ- क्र.उशिसं/२०१६अपंग/मवि-१/४९११ , दि.०७/०४/२०१६**

**महोदय,**

उपरोक्त विषयास अनुसरून आपल्या कार्यालयास प्राप्त झालेल्या मा. सहसंचालक,उच्च शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून संदर्भिय पत्र माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित करण्यात येत असून सदर पत्राचे अवलोकन व्हावे व सदर पत्रान्वये दिलेल्या सूचनेनुसार आवश्यक ती कार्यवाही करावी.

सदर पत्र विद्यापीठाच्या **http://su.digitaluniversity.ac** या संकेतस्थळावर **Circulars/Notices** या मथळयाखाली उपलब्ध आहे.

आपला विश्वासु,
संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

# 10% Reservation policy for EWS

**खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी शासकीय सेवा व शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेशाकरिता १०% जागा आरक्षित करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग**

**शासन निर्णय क्रमांक: राआधो- ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२

दिनांक - १२ फेब्रुवारी, २०१९

**प्रस्तावना:-**

संसदेने संविधानात १०३ वी घटना दुरुस्ती कायदा, २०१९ पारित केलेला आहे. त्याद्वारे भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद १५ व १६ मध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे. उक्त घटना दुरुस्तीन्वये राज्य घटनेच्या अनुच्छेद १५ मध्ये खंड (६) चा समावेश करण्यात आला आहे. या सुधारणेनुसार अनुच्छेद १५ च्या खंड (४) व (५) मध्ये नमूद वर्गाव्यतिरिक्त आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांच्या नागरिकांच्या प्रगतीसाठी कोणतीही विशेष तरतूद करता येईल, तसेच खंड (४) व (५) मध्ये नमूद वर्गाव्यतिरिक्त आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी अनुच्छेद ३० च्या खंड (१) मध्ये संदर्भित अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांखेरीज, अन्य शैक्षणिक संस्थांमध्ये तसेच खाजगी शैक्षणिक संस्थांमध्ये-मग त्या राज्य शासनाकडून अनुदान प्राप्त असोत अगर अनुदान प्राप्त नसोत-प्रवेश देण्याशी संबंधित असतील तेथवर राज्य शासनास १० टक्के पर्यंत जागा आरक्षित करता येतील. अनुच्छेद १५ मधील कोणत्याही तरतूदीचा किंवा अनुच्छेद १९ च्या खंड (१) च्या उप खंड (g) किंवा अनुच्छेद २९ च्या खंड (२) चा वरीलप्रमाणे विशेष तरतूद करण्यास राज्यास प्रतिबंध होणार नाही. हे आरक्षण सध्या मागासवर्गीयांसाठी विहित असलेल्या आरक्षणाव्यतिरिक्त राहील. (स्पष्टीकरण: अनुच्छेद १५ व १६ करिता आर्थिकदृष्टया दुर्बल घटक म्हणजे राज्य शासन वेळोवेळी आर्थिक उत्पन्न आणि अन्य आर्थिक दुर्बलतेच्या आधारावर अधिसूचित करेल त्याप्रमाणे राहील).

तसेच संविधानाच्या अनुच्छेद १६ मध्ये सुधारणा करुन त्यामध्ये खंड (६) चा समावेश करुन त्याद्वारे शासकीय सेवांमध्ये अनुच्छेद १६ च्या खंड (४) मध्ये नमूद केलेल्या आरक्षणाव्यतिरिक्त आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी १०% पर्यंत आरक्षण ठेवण्यास राज्यास प्रतिबंध होणार नाही अशी तरतूद करण्यात आली आहे. संसदेने पारित केलेला घटना दुरुस्तीचा कायदा हा दिनांक १४ जानेवारी, २०१९ रोजीच्या राजपत्रान्वये अंमलात आला आहे.

सदर घटना दुरूस्तीची राज्यात अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. ही बाब विचारात घेता राज्यातही खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी शासकीय /निमशासकीय सेवा व शासनाचे उपक्रम यामधील सेवेसाठी व अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था वगळता शासकीय, खाजगी, अनुदानित, विना अनुदानित संस्थामध्ये प्रवेशासाठी १०% आरक्षण ठेवण्याचा निर्णय शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार राज्य शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे :-

**शासन निर्णय:-**

भारतीय संविधानातील अनुच्छेद १५ (४) व (५) आणि अनुच्छेद १६ (४) अन्वये आरक्षणाचा लाभ देण्यात आलेल्या प्रवर्गांव्यतिरिक्त (मागासवर्गीय) राज्यातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी, शासकीय शैक्षणिक संस्था/ अनुदानित विद्यालये, महाविद्यालये, सर्व उच्च शिक्षण देणाऱ्या शैक्षणिक संस्था, विना अनुदानित विद्यालये, महाविद्यालये व शैक्षणिक संस्था यामध्ये एकूण प्रवेश द्यावयाच्या जागांमध्ये १० % आरक्षण विहित करण्यात येत आहे. सदर आरक्षण राज्यघटनेच्या अनुच्छेद ३० च्या खंड (१) मध्ये संदर्भीत अल्पसंख्याक संस्थाना लागू होणार नाही.

तसेच राज्यातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी शासकीय आस्थापना, निमशासकीय आस्थापना, मंडळे/महामंडळे/नागरी स्थानिक स्वराज्य संस्था/ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था, प्राधिकरणे यांच्या आस्थापनावरील नियुक्तीसाठी सरळसेवेच्या पदांमध्ये १० % आरक्षण विहित करण्यात येत आहे.

२. **आर्थिकदृष्टया दुर्बल घटकासाठीच्या आरक्षणाचा लाभ खालील अटींच्या अधीन अनुज्ञेय राहील :-**

(अ) राज्यातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकासाठी ज्या व्यक्तीच्या जातींचा महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (वि.जा.) भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम, २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८) व महाराष्ट्र राज्य सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे ) आरक्षण अधिनियम,२०१८ (सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६२) यामधील प्रवर्गामध्ये समावेश नाही त्यांच्यासाठी शासकीय शैक्षणिक संस्था/ अनुदानित विद्यालये, महाविद्यालये, शैक्षणिक संस्था, विना अनुदानित विद्यालये, महाविद्यालये, शैक्षणिक संस्था यामध्ये एकूण प्रवेश द्यावयाच्या जागांमध्ये १०% आरक्षण विहित करण्यात येत आहे. सदर आरक्षण राज्य घटनेच्या अनुछेद ३० च्या खंड (१) मध्ये संदर्भीत अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थाना लागू होणार नाही.

तसेच शासकीय आस्थापना, निमशासकीय आस्थापना, मंडळे/महामंडळे/नागरी स्थानिक स्वराज्य संस्था/ग्रामिण स्थानिक स्वराज्य संस्था, प्राधिकरणे यांच्या आस्थापनेवरील सरळसेवेच्या पदांच्या सर्व संवर्गातील नियुक्तीसाठी १०% पदे ही आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी राखीव राहतील.

(ब) हे १०% आरक्षण राज्यात सध्या महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (वि.जा.), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम, २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८) अन्वये विहित करण्यात आलेल्या मागासवर्गांसाठी व महाराष्ट्र राज्य सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा

पदांचे) आरक्षण अधिनियम,२०१८ (सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६२) अन्वये सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास घटकांसाठी विहित करण्यात आलेल्या आरक्षणाव्यतिरिक्त राहील.

(क) आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांच्या आरक्षणाच्या लाभासाठी पात्रता:-

(१) ज्या अर्जदाराच्या/ उमेदवाराच्या कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. ८ लाखाच्या आत असेल त्या अर्जदारास/ उमेदवारास आर्थिकदृष्टया दुर्बल समजण्यात येईल व या आरक्षणाच्या लाभासाठी तो पात्र राहील.

(२) या आरक्षणाच्या लाभासाठी कुटुंब म्हणजे अर्जदाराचे/ उमेदवाराचे आई -वडील व १८ वर्षा खालील भावंडे तसेच अर्जदाराची/ उमेदवाराची १८ वर्षाखालील मुले व पती/पत्नी यांचा समावेश होईल. कुटुंबाच्या एकत्रित उत्पन्नात त्याच्या कुटुंबातील सदस्यांच्या सर्व स्त्रोतांमधून मिळणा-या उत्पन्नाचा समावेश असेल म्हणजेच वेतन, कृषी उत्पन्न, उदयोग-व्यवसाय या व इतर सर्व मार्गातून होणारे, अर्ज दाखल करण्याच्या दिनांकाच्या मागील आर्थिक वर्षाचे वार्षिक उत्पन्न एकत्रितपणे रु. ८ लाखापेक्षा कमी असावे.

(३) आर्थिक दुर्बल घटकासाठीच्या आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी या सोबत विहित करण्यात आलेल्या नमुन्यात (परिशिष्ट-अ) सक्षम प्राधिका-याचे पात्रता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. तसेच यासाठी सादर करावयाच्या अर्जाचा नमुना (परिशिष्ट-ब), अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे / पुरावा (परिशिष्ट-क) आणि घोषणापत्र (परिशिष्ट-ड) सोबत जोडण्यात आलेल्या नमुन्याप्रमाणे असणे आवश्यक राहील.

(४) या आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी ती व्यक्ती किंवा तिचे कुटुंबीय महाराष्ट्र राज्यात दि. १३ ऑक्टोबर १९६७ रोजी किंवा त्यापूर्वीचे रहिवासी असणे आवश्यक राहील.

(५) सदर प्रवर्गातील उमेदवारांना वय, परीक्षा फी व इतर अनुज्ञेय सवलती ह्या इतर मागास प्रवर्गास राज्य शासनाने वेळोवेळी लागू केलेल्या नियमानुसार राहतील.

**(ड) पात्रता प्रमाणपत्रासंबंधातील कार्यपद्धती -**

(१) आर्थिक दुर्बल घटकासाठीच्या आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी पात्रता प्रमाणपत्र देण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून तहसिलदार यांना घोषित करण्यात येत आहे आणि आवश्यकता असल्यास जिल्हाधिकारी यांना एकाहून जास्त तहसिलदारांना सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्याचे अधिकार राहतील.

(२) आर्थिकदृष्टया दुर्बल घटकासाठी आवश्यक पात्रता प्रमाणपत्र मिळण्यासाठी लाभधारकाकडून आवश्यक कागदपत्रांसह अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांकापासून एका महिन्यात (३० दिवसांच्या आत) लाभधारकास पात्रता प्रमाणपत्र देणे बंधनकारक राहील. ते देण्यास नकार दिल्यास अथवा चुकीचे दिल्यास त्या विरुध्द अपिल दाखल करण्याची कार्यपध्दती खालीलप्रमाणे विहित करण्यात येत आहे.

(i) सक्षम प्राधिकाऱ्याच्या निर्णयाविरुध्द अपिलिय अधिकारी म्हणून त्यांच्या कार्यक्षेत्राचे उपजिल्हाधिकारी किंवा जिल्हाधिकारी यांनी नामनिर्देशित केलेला उपजिल्हाधिकारी पदापेक्षा कमी दर्जाचा नाही असा अधिकारी हे राहतील.

(ii) वर (i) मध्ये नमूद केलेल्या अपिलिय अधिकाऱ्याच्या निर्णयाविरुध्द अपिलिय अधिकारी म्हणून त्यांच्या कार्यक्षेत्राचे जिल्हाधिकारी हे राहतील.

(iii) वरील अपिलिय अधिकारी यांना अपिल प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून एका महिन्यात (३० दिवसांच्या आत) निर्णय देणे बंधनकारक राहील.

**(इ) या आरक्षणा अंतर्गत आरक्षित बिंदु व आरक्षणाचा लाभ लागू होण्याचा दिनांक :-**

१) या आरक्षणा अंतर्गत समाविष्ट होणा-या वर्गाकरिता सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दि. २९.०३.१९९७ व दि. ५.१२.२०१८ अन्वये निश्चित केलेल्या १०० बिंदु नामावलीतील बिंदु क्रमांक ८,१६,२६,३८,४६,५६,६८,७६,८६,९८ आरक्षित राहतील.

२) (अ) आर्थिकदृष्टया दुर्बल घटकासाठीचे १०% आरक्षण राज्यात अंमलात येण्याचा दिनांक ०१.०२.२०१९ हा राहील.

(ब) तसेच १०३ व्या घटनादुरुस्ती अन्वये करण्यात आलेला कायदा दिनांक १४ जानेवारी, २०१९ पासून अंमलात आलेला असल्याने दिनांक १४ जानेवारी, २०१९ ते ३१ जानेवारी, २०१९ या कालावधीत ज्या जाहिरातींमध्ये व प्रवेश प्रक्रियेत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकासाठी १० टक्के आरक्षणानुसार पदांचा समावेश केला असेल अशा पदांनासुध्दा हे आरक्षण लागू राहील.

३) ज्या उमेदवारांनी या आदेशाच्या दिनांकापूर्वी नियुक्तीसाठी अर्ज केलेले असतील त्यांच्यापैकी तसेच वरील (ब) मध्ये नमूद केल्याप्रमाणे त्या कालावधीत व त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे पदांचा समावेश केलेला असेल त्या जाहिरातीनुसार / प्रवेश प्रक्रियेत नियुक्तीसाठी अर्ज केलेले असतील अशांपैकी जे उमेदवार परिच्छेद २ मध्ये नमूद अधिनियमांमधील मागासप्रवर्गांध्ये समाविष्ट नाहीत अशा उमेदवारांना ते आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांमधून नियुक्तीसाठी इच्छुक आहेत किंवा कसे याबाबत विकल्प देण्याचा पर्याय उपलब्ध राहील.

४) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठीचे पात्रता प्रमाणपत्र या आदेशाच्या दिनांकापासून किंवा अर्ज सादर करण्याच्या दिनांकापासून ६ महिने यापैकी जो नंतरचा असेल त्या दिनांकापर्यंत सादर करणे आवश्यक राहील.

५) ज्या घटकांना सेवेमध्ये समांतर आरक्षण लागू आहे त्या घटकांना आर्थिकदृष्टया दुर्बल या सामाजिक प्रवर्गामध्ये देखील सेवेत समांतर आरक्षण लागू राहील.

४. शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाबाबतचे आवश्यक आदेश शालेय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये, कृषि, पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय व इतर संबंधित विभागांनी तात्काळ निर्गमित करावेत.

५. हा शासन निर्णय शासकीय/ निमशासकीय सेवा, मंडळे/महामंडळे, नगरपालिका / महानगरपालिका, जिल्हा परिषदा, शासकीय विद्यालये, महाविद्यालये, शासकीय शैक्षणिक संस्था, खाजगी विद्यालये, महाविद्यालये, शैक्षणिक संस्था, अनुदानित/विना अनुदानित विद्यालये, महाविद्यालये व शैक्षणिक संस्था आणि ज्यांना आदेश देण्याचा अधिकार शासनाला आहे, अशी इतर सर्व प्राधिकरणे, सेवा व संस्था यांना लागू राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०२१२१४१५०२१४०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHIVAJI
RAGHUNATH
DAUND

Digitally signed by SHIVAJI RAGHUNATH DAUND
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=b99a2e19c425d8a33bf92aacc08f1abf37c100141f30d445bb4f9eaf5acb6e718, postalCode=400032,
street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=a08a9964fa88914fd0b09566966e822b221982cc926ec215f4b3ac3db9582d97e, ou=NA,
o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SHIVAJI RAGHUNATH DAUND
Date: 2019.02.12 14:17:38 +05'30'

**(शिवाजी दौंड)**
सचिव (साविस), महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) मा. विरोधीपक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा/ विधानपरिषद,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
२) मा. सर्व सन्माननिय विधानसभा/ विधानपरिषद,व संसद सदस्य महाराष्ट्र राज्य
३) मा. राज्यपालांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबारहिल, मुंबई.
४) मा. मुख्यमंत्र्यांचे अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान परिषद) विधानभवन, मुंबई.
६) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान सभा) विधानभवन, मुंबई.
७) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव.
८) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१, मुंबई,
९) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-२, नागपूर,
१०) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई. (५ प्रती)
<u>त्यांना विनंती की, प्रस्तुत शासन निर्णय प्रसिध्द करण्यात यावा.</u>
११) प्रबंधक, मा.उच्च न्यायालय, मुळ न्याय शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१२) प्रबंधक, मा.उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१३) प्रबंधक, मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१४) प्रबंधक, मा. लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई.
१५) सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य.
१६) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य.
१७) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१८) उप सचिव (आस्थापना शाखा), सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९) सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२०) मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
२१) सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.

२२) सचिव, राज्य माहिती आयोग, मुंबई.
२३) सरकारी वकील, उच्च न्यायालय, मुळ शाखा व अपील शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर,
२४) सरकारी वकील, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर,
२५) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२६) सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
२७) विधिमंडळ ग्रंथालय, महाराष्ट्र विधानभवन, मुंबई (१० प्रती),
२८) सर्व महामंडळे , मंडळे आणि सार्वजनिक उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
२९) सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये, महाराष्ट्र राज्य,
३०) निवड नस्ती/कार्यासन १६-अ.